उद्योजक महिला

Nirmala Adhikari

नेपाळमधील दांडाफाया गावात जैविक पद्धतीने उत्पादित केलेल्या भाजीपाल्याच्या सेवनाने तेथील समुदायाचे आरोग्य सुधारले. दांडाफाया गावातील महिलांनी एकत्र समूह तयार करून व सेंद्रीय भाजीपाला उत्पादित करून त्यांचे नुसते उत्पन्नच वाढले नाही तर त्यांना रोजगाराच्या शाश्वत संधी उपलब्ध झाल्या, सोबत त्या सामाजिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या.

दांडफाया हे गाव नेपाळमधील ६ व्या प्रांतातील हिमालयात दूरवर अशा हुमला जिल्ह्यात सिमकोट-माऊंट कैलाश व मानसरोवर ट्रॅकिंग रस्त्यावर आहे. शेती हे त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे. परंपरेने महिला ह्या शेतातच व्यस्त राहत होत्या. कुट्टू (Buckwheat), बार्ली (Nacked Barly), नाचणी (Finger millch), हिमालयीन बाजरी (Himilayan millet), बटाटे, गहू व धान इत्यादींचे उत्पादन घेत होत्या. शेतीच्या पारंपारिक पद्धतीचा अवलंब करून व स्थानिक वाणे वापरून ते त्यांचे उत्पादन घेत. त्याचे उत्पादन फार कमी येते. त्यांची अन्नधान्याची वर्षातील फक्त ३-४ महिन्यांची गरज पूर्ण करी. महिला भाजीपाल्यामध्ये कोहळे, मिरची व शलगम ह्यांची लागवड करीत. जे



गावातच विंचा जवळच्या बाजारात महिला वृत्तिमाल विक्रीताना

वर्षातील ३ महिन्यांसाठी पुरत असे. त्यामुळे तेथील बहुतांश मुले ही कुपोषित होती.

कॉमन फोरम फॉर डेव्हलपमेंट (CFD) ही स्वयंसेवी संस्था २०१२ पासून हुमला जिल्ह्यात ग्रामीण गरिबांचे जीवनमान सुधारण्यासाठी कार्य करीत आहे. उपजीविका, अन्नसुरक्षा, आरोग्य सेवा, शिक्षण, समुदाय व्यवस्थापन, लिंग समानता अशा विविध मुद्यांवर कार्य करते. महिला दलित, स्थानिक जनजाती व वार्षिक उत्पन्न हे ५०,०००/- रुपयांपेक्षा कमी आहे, अशा समुहासोबत मिळून संस्था काम करीत आहे.

२०१४ मध्ये सीएफडीने दांडाफाया गावाला भेट दिली व तेथील महिलांशी त्यांच्या भाजीपाला उत्पादन पद्धती, त्यांच्या अडचणी व आव्हाने ह्याविषयी चर्चा केली व त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी काम करण्याचे निश्चित केले.

कॉमन फोरम फॉर डेव्हलपमेंट (CFD)

CFD ही नेपाळमधील एक अग्रगण्य स्वयंसेवी संस्था. संस्थेची स्थापना २०१२ झाली. ही संस्था नेपाळच्या हिमालयीन जिल्ह्यातील मध्य पश्चिम करताली झोन मध्ये राहण्याऱ्या गरिब, दुर्लक्षित, वंचित लोकांसाठी लहान व सिमान्तिक शेतकरी वर्गासाठी त्यांचे दारिद्र्य निर्मूलन अन्न सुरक्षा इं.बाबत कार्यरत आहे. त्यांनी महिला, दलित व इतर उपेक्षित तसेच स्थानीय समूहांना सुधारित ग्रामीण कामांद्वारे दारिद्र्यातून बाहेर निघण्यासाठी, जास्त स्वयंपूर्ण व सशक्त होण्यासाठी सक्षम केले. त्यांनी लोकांना नेपाळमधील अत्यंत गरिबीतून निघण्यासाठी स्वतःची मदत करून कमी खर्चाचे उपाय शोधण्यास मदत केली.

सेंद्रीय भाजीपाला उत्पादन

२०१४ च्या मध्यात सीएफडीने ग्रामीण महिलांशी सेंद्रीय भाजीपाला उत्पादन व विपणनचे महत्त्व व शक्यता ह्याविषयी चर्चा केली. चर्चेत असे लक्षात आले की सेंद्रीय भाजीपाल्याला फार चांगली मागणी आहे. विशेषतः दरवर्षी भारतीय यात्रेकरू कैलाश पर्वत व मानसरोवराला सीमाकोटच्या रस्त्याने भेट देतात आणि डीडीसीच्या अहवाल/नोंदीनुसार ही संख्या २०१७ मध्ये ११००० वर पोहचली.

सेंद्रीय भाजीपाल्याचे महत्त्व त्यांच्या पोषक तत्त्वे पुरविण्याच्या व उत्पन्न देण्याच्या क्षमतेसोबतच वाढती मागणी ह्यामुळे दांडीफाया गावातील महिलांनी सेंद्रीय भाजीपाल्याची लागवड करण्याचे ठरविले. २०१५ मध्ये सीएफडीने महिलांचे सेंद्रीय भाजीपाला गट तयार करण्यास सहाय्य केले. गटातील सदस्यांनी सीएफडीच्या सहकार्याने सेंद्रीय भाजीपाला उत्पादन

वाढविण्यासाठी व विपणन करण्याच्या कल्पना विकसित केल्या. एकत्रितपणे त्यांनी उपक्रम व अंमलबजावणीची योजना तयार केली.

ज्या गावाने २०१४ मध्ये बियाणेसाठी बक्षीस मिळवले होते तेथील महिला समूहांशी संवाद साधण्यासाठी एक अभ्यास दौरा आयोजित केला होता. ह्या दौऱ्यांमुळे दांडाफाया गावातील महिला शेतकऱ्यांना त्यांचा व्यवसाय चालविण्यासाठी आत्मविश्वास मिळाला.

क्षमता बांधणी (Capacity Buildia)

आता समुहातील सदस्यांना प्रशिक्षण देणे ही एक महत्त्वाची पायरी होती. महिलांना सेंद्रीय भाजीपाला उत्पादनाच्या तांत्रिक व व्यवस्थापनाच्या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. एक ३-७ दिवसांचे प्रशिक्षण घेण्यात आले.त्यामध्ये परसबाग, नर्सरी व्यवस्थापन, कंपोस्टिंग व त्याचा उपयोग, वनस्पतीजन्म पेस्टीसाईड तयार करणे व त्याची उपयोगिता ग्रीन हाऊस/पॉलीटनेल बांधणी व व्यवस्थापन, व्यवसाय योजना तयार करणे, सूक्ष्म व्यवसाय विकास इत्यादीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. ही सर्व प्रशिक्षणे जिल्हा कृषी विभागासोबत मिळून घेण्यात आली होती. तसेच शेतीत त्यांना रोपांचे बेड तयार करणे, कंपोस्ट बनविणे, रोपे लावणे, तण काढणे, स्थानिक पीक संरक्षक औषधे वापरणे, कापणी, प्रतवारी, पॅकिंग, वाहतूक, विक्री इत्यादी मुद्यावर देखिल प्रशिक्षण दिले.

पुढे गट तयार करणे, गटाच्या बैठका, नोंदी ठेवणे, बचत व पत व्यवस्थापन, पोषण, आरोग्य व स्वच्छता इत्यादींचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. उपक्रम चालविण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी समूहाच्या सदस्यांनी सीएफडी द्वारा आयोजित आर्थिक साक्षरतेच्या ६ महिन्यांच्या वर्गात सहभाग घेतला. महिला सभासदांमध्ये सेंद्रीय शेतीबद्दल लक्षणीय जागरूकता वाढली.

सेंद्रीय भाजीपाला उत्पादन

गटातील सर्व सदस्य विविध स्तरांवर भाजीपाल्याचे उत्पादन घेतात. ज्यांच्याकडे लहान जमिनी आहेत अशा महिला त्यांच्या कुटुंबाला पुरतील

महिला सभासदांमध्ये सेंद्रिय शेतीबद्दल लक्षणीय जागरूकता वाढली.





सेंद्रीय पद्धतीने तयार झालेली पत्ताकोबी

एवढा भाजीपाला उत्पादित करतात. तथापि काही महिला त्यांच्या जमिनीच्या ५-६ रोवणीमध्ये भाजीपाला पिकवितात. (१९.६७ रोवणी = १ हेक्टर) सध्या सेंद्रीय भाजीपाला हा ७५ पेक्षा जास्त रोवण्यांमध्ये घेण्यात येत आहे.

सभासद विविध प्रकारचा भाजीपाला - कांदे, टमाटर, फुलकोबी, पत्ताकोबी, गाजर, लसूण, ब्रोकोली, कोहळे, वांगी, काकडी, कोथिंबीर, पालक, मोठ्या पानाची मोहरी इत्यादी पिकवतात. साधारणपणे बाजारात असलेल्या मागणीनुसार भाजीपाला पिकांची लागवड ठरते. त्यात बिगर हंगामी व विशेष बाजार, जो पर्यटन हंगामात (मे-सप्टेंबर) व दशहित, नेपाळी महत्त्वाचा सण जो दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात असतो. त्याचा विचार सुद्धा भाजीपाला उत्पादन घेताना केला जातो.

महिला उद्योजक गट त्यांनी तयार केलेले कम्पोस्ट व सेंद्रीय किटकनाशकांचा वापर पिकांसाठी करतात. त्यात कम्पोस्ट हे घरातील परसाता जनावरांचे शेण व घरातील सेंद्रीय कचरा ह्याचा वापर करून वैयक्तिकरित्या तयार केले जाते तर सेंद्रीय पीक संरक्षक हे सामुदायिकरित्या तयार केले जाते. सेंद्रीय किडनाशके हे स्थानिक स्तरावर उपलब्ध वनस्पतींपासून तयार करून समूहातील सदस्यांमध्ये वाटल्या जाते.

थंडीच्या हंगामात जेव्हा बर्फ पडतो तेव्हा महिला भाजीपाल्याचे उत्पादन ग्रीन हाऊस किंवा पॉली टनेलमध्ये घेतात. ग्रीन हाऊस हे स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेले साहित्य वापरून बनवतात. साधारणतः ९०-१२० जीएसएम प्लॉस्टिक, ग्रीन हाऊसचे छत, पॉली टनेलचे प्लॉस्टिक पाणी देण्याची झारी व बगीच्याचे पाईप इ. स्वरूपात सीएफडीद्वारा आंशिक मदत मिळाली. उत्पादनाची विक्री महिला स्वतः करतात. महिला त्यांचे उत्पादन त्यांची घरची पोषणाची गरज पूर्ण झाल्यानंतर स्थानिक किंवा सीमकोटच्या बाजारात विकतात. तिथे त्यांना अनेक हॉटेल्स व रेस्टॉरेंटसमध्ये मोठी मागणी राहते. २०१५ मध्ये घराचे

सरासरी उत्पन्न हे २२,००० नेपाळी रुपये होते. २०१६ मध्ये ते २६,००० तर २०१७ मध्ये ते वाढून ३७००० नेपाळी रुपये झाले. जे मुख्यतः कांदे, लसूण, मिरची, टोमॅटो, फुलकोबी, ब्रोकोली, काकडी, पत्ताकोबी व गाजर यांच्या विक्रीतून मिळाले.

सध्या विक्री ही एकट्याने केली जाते. परंतु पुढे एकत्रित विक्री करण्याची ही त्यांची योजना आहे.

> भाजीपाल्यामुळे मला गरिबीशी लढण्यास मदत मिळाली. मी माझ्या मुलांसाठी नवीन कपडे घेऊ शकले व माझ्या पतीने घेतलेले ५००० रुपयांचे कर्ज फेडले. मी माझ्या शेजाऱ्यांना व नातेवाईकांना भेटवस्तू दिल्या जे या अगोदर देणे मला परवडत नव्हते. याबाबत मला समाधान वाटते.
>
> लुडकी महिला सेंद्रीय भाजीपाला उत्पादक समूह, दांडाफाया गटाची एक सदस्य

काही परिणाम

सेंद्रीय शेतीच्या प्रशिक्षणाचा अतिशय सकारात्मक प्रभाव परसबागेतील शेती व व्यावसायिक भाजीपाला शेती यावर होत आहे. सेंद्रीय शेतीबद्दलची जागरूकता ही लक्षणीयरित्या वाढली. विशेष करून महिलांमध्ये ज्या आता सेंद्रीय शेतीचा वापर करतात. त्या आता इतर लोकांना सुद्धा तसे करण्यास प्रोत्साहित करीत आहे. गटातील बहुतांश सदस्य असे म्हणतात की ग्रीन हाऊस व विस्तार सेवा सोबत सेंद्रीय भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञानामुळे त्यांची शेती पद्धती बदलण्यास मदत मिळाली.

सेंद्रीय भाजीपाल्याच्या लागवडी व विक्रीमुळे हुमला जिल्ह्यातील महिला उद्योजक गटांना त्यांचे उत्पन्न वाढविणे व शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे शक्य झाले. वाढलेल्या उत्पन्नामुळे महिला आता आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत आहे व शाळेचा गणवेश व वह्या पुस्तके घेऊ शकत आहेत. त्या आता 'तीज' सण, जो महिलांचा सण प्रत्येक वर्षी सप्टेंबर महिन्यात येतो त्यासाठी लाल साडी व बांगड्या विकत घेऊ शकत आहेत.

> कुपोषित मुलांची व अतिसार रोग्यांची आरोग्य केंद्राला भेट देण्याची संख्या सेंद्रीय अन्न खाल्ल्यामुळे लक्षणीयरित्या कमी झाली.



महिला आता बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादन वाढविण्याची योजना करीत आहे.

हुमला येथील स्थानिक समुदायाचा आता विश्वास आहे की त्यांची मुले ही जास्त भाजीपाला खाणे सुरू केल्यानंतर निरोगी दिसत आहेत.

स्थानिक आरोग्य कर्मचारी असे म्हणतात की आता कुपोषित मुले व अतिसार रोग्यांची संख्या आरोग्य केंद्रात लक्षणीयरित्या कमी झाली आहे.

महिलांचा दुर्लभ असा आवाज आता घरात व समाजात सुद्धा ऐकणे सुरू झाले आहे. त्यापैकी काही या राजकीय पक्षाद्वारे स्थानिक व प्रांतीय विधानसभा पातळीच्या निवडणुकाही लढल्या व जिंकल्या.

पुढील योजना

थंड हवामानात घेतल्या जाणाऱ्या सेंद्रीय भाज्या जास्त चविष्ट असल्यामुळे नेपालगंज व सुखेतमध्ये त्यांची मागणी वाढत आहे. गट आता उत्पादन वाढवून बाजारपेठेची मागणी पूर्ण करण्याची योजना करीत आहे. हुमला जिल्ह्याला रस्त्याद्वारे संपर्क नसल्यामुळे प्रत्येक वस्तू नेपाळगंजला हवाईमार्गाने न्यावे लागते वा सुखेतपासून सध्या १५-२० हवाई कार्गो सेवा जी सिमकोट, हुमलापासून दररोज चालते. त्यामुळे उत्पादन वाढीसाठी पुष्कळ वाव आहे. सहसा कार्गो सेवा ही वस्तू व साहित्य घेऊन जाते व नेपाळगंज व सुरखेतला येताना (रिकामी) कुठल्याही वस्तू वा साहित्याशिवाय येते याच्या फायदा गटाला त्यांच्या भाजीपाल्याची वाहतूक माफकदरात नेपालगंज व सुरखेतला करण्यासाठी करता येईल.

मोठ्या संख्येत महिला सेंद्रीय भाजीपाला गटाशी जुळण्यास इच्छा असल्यामुळे आता गट त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविण्याच्या योजना तयार करीत आहेत. यामुळे सेंद्रीय भाजीपाल्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासोबतच महिलांच्या या उपक्रमामुळे त्यांचे उत्पन्न ४०-५०% पुढील पाच वर्षात वाढणे अपेक्षित आहे.



जास्त भाजीपाला खाणे सुरू केल्यानंतर मुले निरोगी झाली.

येथील महिला सेंद्रीय भाजीपाला उत्पादन व्यवसायाला एक मोठे यश समजत असून ते गावाला त्या भागातील मुख्य सेंद्रीय भाजीपाला उत्पादनाचे केंद्र बनविण्याचा मानस ठेवत आहे. ते त्यांच्या गावाला पुढील ५ वर्षात विषमुक्त करण्याचा सुद्धा विचार करीत आहे हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

Nirmala Adhikari
Executive Director,
Common Forum for Development (CFD)
P.O. Bo. 13141, Sundhara Kathmandu,
Nepal
E-mail : nadhikari@cfd.org.np

मराठी अनुवाद - श्री. लक्ष्मीकांत पडोळे

Source : Women as Entrepreneurs – LEISA India June 2018.